# प्रेसनोट दि. २०/०५/२०१९

**दि. १२/०५/२०१९ ते १८/०५/२०१९ या आठवडा कालावधीतील सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील प्राप्त तक्रारी अर्जातील डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉडचे बाबतीत अर्जदाराची फसवणुक झालेली रक्कम रुपये १,१७,९७७/- अर्जदार यांना रिफंड करण्यात आली.**

सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे तक्रारी अर्जापैकी डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉडचे बाबतीत अर्जदाराची फसवणुक झालेली रक्कम जर माहिती (ओटीपी) शेअर केला गेला असेल तर बँकेकडून सदर रक्कम रिफंड केली जात नाही. अशा प्रकारच्या अर्जामध्ये पैसे विविध मर्चंट / वॉलेट पैसे गेले असतात सायबर सेल, संबंधित मर्चंट / वॉलेट यांना मेलद्वारे पत्रव्यवहार करुन अर्जदार यांना त्याची रक्कम रिफंड करुन दिली जाते. अशाच प्रकारच्या एका अर्जात अर्जदार अवधुत वाघमारे यांना बँकेतुन बोलत आहे असे सांगुन त्याची सर्व माहिती घेवुन त्याची एक लाख रुपयाची फसवणुक केली होती. सदर बाबत पेटीएम या मर्चटशी पत्रव्यवहार करुन त्याची ३०,०००/- रुपये रिफंड करण्यात आली.

दुस-या प्रकारात ओटीपी शेअर केला नसेल किंवा अर्जदार यांचे डेबीट / क्रेडीट कार्ड त्याच्या ताब्यात असताना सुध्दा त्याच्या खात्यावरील रक्कम काढली जाते अशावेळी सायबर क्राईम पोलीस स्टेशन मार्फत त्याची रक्कम परत मिळवुन देण्यासाठी आणि पुढील अर्ज चौकशीसाठी मेलद्वारे सदर बँकला पत्रव्यवहार केला जातो. अशा वेळी ठराविक दिवसानंतर अर्जदार यांची रक्कम संबंधित बँकेमार्फत किंवा मर्चंट/वॉलेट द्वारे अर्जदार यांचे अकाउंटला परत केली जाते. अशाप्रकारे एका अर्जात अर्जदार जिमीन शेख यांच्या डेबीट कार्डवरुन अनधिकृत व्यवहार होवुन त्याची १२,५००/- रुपयाची आर्थिक फसवणुक झालेबाबत नमुद आहे. सदर बाबत तात्काळ पेटीएम या मर्चटशी पत्रव्यवहार करुन त्याची गेलेली संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. दुस-या अर्जात अर्जदार विकास एकनाथ डावरे हे ऑनलाईन खरेदी करीत असताना त्याची १,९७७/- रुपयाची आर्थिक फसवणुक झालेबाबत नमुद आहे. सदर बाबत तात्काळ पेटीएम या मर्चटशी पत्रव्यवहार करुन त्याची गेलेली संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. तसेच अर्जदार नामे कुणाल रविंद्र कापसे यांचे डेबीट कार्ड त्याचे जवळ असताना अनधिकृत ट्रॅन्झॅक्शन होवुन त्याची ३,५००/- रुपयांची आर्थिक फसवणुक अज्ञात इसमाने केली होती. सदर बाबत तात्काळ बँक ऑफ इंडियाशी पत्रव्यवहार करुन अर्जदार यांची गेलेली संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. तसेच अर्जदार विशाल रमेश घरात यांच्या डेबीट कार्डवर अनधिकृत ट्रॅन्झॅक्शन होवुन त्याची ७०,०००/- रुपयांची आर्थिक फसवणुक झालेबाबत नमुद आहे. सदरबाबत व सिटी बँकेशी तात्काळ पत्रव्यवहार करुन त्याची सर्व रक्कम रिफंड करण्यात आली आहे. सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त संभाजी कदम, सहायक पोलीस आयुक्त निलेश मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राधिका फडके यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर मधील अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.